सामान्य माणसाचा उंचावलेला स्वर

# चपराक

संपादक : घनश्याम पाटील

● वर्ष : ६
● अंक : २७
● पाने : ८
● पुणे

मूल्य ₹3

www.chaprak.com

KaMant masale
एकदा वापरून पहाच!
किंग ऑफ टेस्ट
व्हेज-नॉनव्हेजचे स्वादिष्ट मसाले
संपर्क : डी. एम. कामंत फूड प्रॉडक्टस् प्रा. लि.
तिरूमला इंडस्ट्रियल इस्टेट, प्लॉट नं. ४,
टाटा जॉन्सन कंपनीसमोर, हिंजवडी, पुणे ४११ ०५७
दूरध्वनी ०२०-६५२९२४००
Email : dkamant@rediffmail.com Web. : www.kamantmasale.com

■ सोमवार दि. १८ ते २४ जुलै २०१६ ■ RNI No. MAHMAR/2011/35979 ■ पोस्टल नोंदणी क्र. : PCW/159/2014-2016

■ Licensed to post without prepayment of postage no. **WPP - 14** ■ Posted at Pune PSO on every wednesday, date of publication 18/07/2016

# राष्ट्रवादीची ‘रसिक’ता!

## ऊँचे लोक ऊँची पसंद; आमचे गुरू माणिकचंद!

***विविध*** क्षेत्रात आपल्या कार्यकतृत्वाने समाजासाठी दीपस्तंभ ठरलेल्या पूजनीय आणि ऋषितुल्य व्यक्तिंच्या कार्याचा वसा नवीन पिढीसमोर यावा, यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गुरूपोर्णिमेच्या निमित्ताने गुरूजन गौरव सोहळ्याचे आयोजन करते. यंदाच्या ‘गुरूजन’ सोहळ्यासाठी त्यांनी सुप्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर, ज्येष्ठ शल्यविशारद डॉ. शरद हर्डीकर, कायदेतज्ज्ञ भास्करराव आव्हाड आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे ‘गुटखाकिंग’ रसिकलाल धारिवाल यांची निवड केली आहे. या सगळ्या मान्यवरात धारिवालांचे नाव घुसडल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पुण्याच्या साहित्य संमेलनात ‘गुटखावाल्याची देणगी नको’ म्हणून धारिवालांचे वीस लाख रूपये परत करण्यात आले होते. त्याच शहरात त्यांचा ‘गुरूजन’ म्हणून सत्कार होणे क्लेशकारक आहे.

आपल्या ‘कार्यकतृत्वाने’ विख्यात असलेले पुण्यातील नेते आणि राष्ट्रवादीचे नगरसेवक दीपक मानकर हे या सोहळ्याचे आयोजक आहेत. लोकसभा निवडणुकांच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजेच एनसीपी ही ‘नॅशनल करप्ट पार्टी’ असल्याची टीका नरेंद्र मोदी यांनी केली होती. मोदी यांच्या या विधानातील सत्यता अनेकवेळा सिद्ध होऊनही पुण्यासारख्या सांस्कृतिक नगरीत या पक्षाचे प्राबल्य आहे याला काय म्हणावे? श्रीमंत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्रभूषण जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादीचे म्होरके असलेले शरदराव पवार यांनी त्यांच्यावर टीका केली होती. मुळात बाबासाहेब इतिहास संशोधक, अभ्यासक अथवा शिवशाहीर नाहीत असे राष्ट्रवादीवाले बेंबीच्या देठापासून ओरडत सांगत असतात. याच बाबासाहेबांचाही यापूर्वी राष्ट्रवादीने अशाच गुरूपौर्णिमेनिमित्तच्या सोहळ्यात ‘गुरूजन’ म्हणून सत्कार केलेला आहे. यापूर्वी बाबासाहेबांसह ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, संगणकतज्ज्ञ विजय भटकर, क्रिकेटपटू चंदू बोर्डे, दाजीकाका गाडगीळ यांचा गौरव राष्ट्रवादीने केला आहे. यातील प्रत्येक व्यक्ती त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रात हिमालयाच्या उंचीची! त्या जोडीला आता रसिकलाल धारिवाल यांच्यासारख्या गुटखाकिंगचे नाव जोडल्याने राष्ट्रवादीची मूळ प्रवृत्तीच दिसून येते.

**संपादकीय**
घनश्याम पाटील : ७०५७२९२०१२

कोणी कोणता व्यवसाय करावा याला आपल्याकडे बंधने नसली तरी ‘माणिकचंद’सारख्या गुटख्याने अनेकांच्या आयुष्याचे मातेरे केले आहे. ज्या पक्षाचे स्थानिक नेते या सोहळ्याचे आयोजन करत आहेत त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षांना म्हणजेच शरद पवार यांनाही या गुटख्याचा मोठा फटका बसला आहे. दिवसभरच्या व्यग्रतेत अनेकवेळा हा गुटखा चघळण्याची सवय असल्याने त्यांना तोंडाचा कॅन्सर झाला. सुदैवाने योग्य उपचार झाल्याने कॅन्सरमुळे माणूस ‘कॅन्सल’ होत नाही हे त्यांच्याबाबत दिसून




आले; मात्र दुर्दैव हे की याच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष राहिलेले, उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून आपल्या कार्यकतृत्वाची प्रामाणिक छाप उमटविणारे आर. आर. तथा आबा पाटील यांचा कॅन्सरने बळी घेतला. असे सगळे असताना एखाद्या ‘गुटखाकिंग’चा ‘गुरू’ म्हणून सत्कार करणे हे कुणालाही न पचणारे आहे.

गुटख्यासारख्या व्यसनामुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात आणि प्रसंगी त्यात जीवही जाऊ शकतो इतकी अक्कल रसिकलाल धारिवाल यांच्यासारख्या लोकांकडे बघून येते; म्हणूनही त्यांची या गौरव सोहळ्यासाठी निवड केली असावी. हा ‘बोध’ देणारे धारिवाल राष्ट्रवादीसाठीच नव्हे तर समाजासाठीही गुरूच म्हणावे लागतील!! राष्ट्रवादी भ्रष्टवादी झालाय (किंवा सुरूवातीपासूनच आहे) हे सत्य कुणापासूनही लपून राहिलेले नाही. छगन भुजबळ, अजित पवार, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे अशा नेत्यांकडे बघितल्यास त्याची प्रचिती यावी. महाराष्ट्रातील ‘पॉवर’फूल पक्ष म्हणून अनेकजण राष्ट्रवादीकडे बघतात. त्यामुळे अशा धनदांडग्यांचा गुरूही ‘गब्बर’च असायला हवा. रसिकलाल धारिवाल यांच्या गौरवाने ही बाब अधोरेखित झाली आहे.

यशवंतराव चव्हाणांसारख्या लोकनेत्यासोबत आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरूवात करणाऱ्या शरद पवार यांनी साबरमती आणि बारामती या दोन्ही संस्कृतींचा परिचय वारंवार घडवून दिला आहे. ‘मुँह में राम बगल में छुरी’ अशा प्रवृत्तीच्या मंडळींचाच या पक्षात भरणा आहे. सत्तेत असताना आणि नंतरही अनेक ठिकाणी, अनेक प्रकरणात राष्ट्रवादीची भ्रष्टवादी वृत्ती दिसून आलेली आहे. विजय मल्ल्या, शशी थरूर अशा लोकांची मैत्री एकेकाळी अभिमानाने मिरवणारे शरद पवार रसिकलाल धारिवालसारख्या गुटखाकिंगवर कौतुकाचा वर्षाव करताना कचरणार नाहीत. जितेंद्र आव्हाड यांच्यासारखे काही ‘सुविद्य’ आमदार त्यांची तळी उचलायला सोबत आहेतच.

पुणे ही सांस्कृतिक नगरी आहे. विद्येचे माहेर घर असा या शहराचा लौकिक आहे. राजकीय उलथापालथी, घोटाळे, भ्रष्टाचार, अरेरावी, दादागिरी, जुलूमशाही हे सगळे सगळ्याच पक्षात थोड्याफार प्रमाणात चालते; मात्र आपण सांस्कृतिक क्षेत्रात किती भरीव योगदान देतोय हे दाखविण्यासाठी साहित्य संमेलनात लूडबूड करणे, साहित्य संस्थांच्या कारभारात दखल घालणे, सांस्कृतिकतेच्या नावावर माणिकचंदच्या रसिकलाल धारिवाल यांचा ‘गुरू’ म्हणून गौरव करणे हे सारेच या शहराच्या प्रतिमेला कलंकित करणारे आहे. भटकर, माशेलकर, पुरंदरे यांच्या बरोबरीने धारिवालचा इतिहास गिरवावा लागणे यापेक्षा शरमेची बाब कोणती असू शकते?

अशा अनेक कारनाम्यांमुळे देशात आणि राज्यात राष्ट्रवादी आणि त्यांच्या मित्रपक्षांना धूळ चाखावी लागली आहे. या नैराश्येतून शरद पवार यांच्यासारखे जबाबदार नेतेही सुटले नाहीत. हातची सत्ता गेल्यानंतर वेळोवेळी त्यांनी जी बालिश विधाने केली ती उभ्या महाराष्ट्राने पाहिलेलीच आहेत. त्यांच्याच संस्कारात वाढणारे शहरातील नेते त्यांचाच कित्ता गिरवत अशा कार्यक्रमांचे आयोजन करत आहेत. ‘काँग्रेसमुक्त भारत’ हे मोदींचे स्वप्न पूर्ण होईल की नाही हे आम्हास ठाऊक नाही; पण राष्ट्रवादीच्या अशा अनेक ‘पराक्रमा’मुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मात्र बुडण्याच्या मार्गावर आहे हे या सर्वातून लखखपणे दिसून येत आहे. ■

# चोरी...



**शाळेमध्ये** असताना गुरूजी चोरी करण्याच्या परिणामाबाबत असे सांगत असत की, चोरी करणे नैतिकदृष्ट्या पाप आहे तर कायदेशीरदृष्ट्या गुन्हा आहे. जेणे करून विद्यार्थ्यांनी चोरी करण्यापासून परावृत्त व्हावे. मात्र सद्यस्थितीचे अवलोकन करताअसे प्रकर्षाने जाणवते की, असे कोणतेही सरकारी खाते असो, खाजगी संस्था असो, व्यापारी उद्योगधंदे असो अशा जवळ जवळ सर्वच क्षेत्रात चोऱ्या प्रत्यही केल्या जात आहेत. याशिवाय पाकिटमारी, खिसे कापणे यांसारख्या भुरट्या चोऱ्या आणि दरोडेखोरी हे तर चोरी करण्याचे स्वतंत्र व्यवसायच झालेले आहेत. या सर्व प्रकारांमुळे जनतेच्या पैशाची कशी लूट केली जाते हे स्पष्टपणे दिसून येते. यावरून माणसाची नैतिकतेची पातळी किती खालावली आहे आणि तो करत असलेल्या चोऱ्यांबाबत त्याला खंतही वाटत तर नाहीच शिवाय तो करीत असलेल्या गुन्ह्याबाबत त्याला होणार असलेल्या शिक्षेचीही भीती त्याला वाटत नाही.

माणसांच्या जीवनावश्यक गरजांपैकी पाणी मग ते पिण्याचे असो वा शेतीसाठी असो, वीज घरगुती वापरासाठी असो वा व्यापारासाठी असो, अन्नधान्य मग ते रेशनवरील असो वा इतर प्रकारचे असो, पेट्रोल, डिझेल, रॉकेल यांसारखे इंधन असो वा आजाऱ्यांसाठी लागणारी औषधे असोत अशा सर्वच प्रकारच्या जीवनावश्यक गरजांच्या बाबतीत राजरोसपणे संबंधितांकडून चोऱ्या केल्या जातात. त्याबद्दल काहींना सबळ पुराव्याअभावी दोषमुक्त करण्यात येते तर काहींना त्यांच्या चोरीच्या मानाने किरकोळ शिक्षा, दंड करून सोडून दिले जाते. त्यामुळे अशाप्रकारच्या चोऱ्या करणाऱ्याला आपण जे करतो ते पाप आहे किंवा गुन्हा आहे. याची अजिबात खंत वाटत नाही. प्रवासात प्रवाश्यांचे खिसे कापणे, त्यांची पाकिटे मारणे, स्त्रियांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावणे यांसारखे किरकोळ चोऱ्यांचे प्रकार सामुहिक वा वैयक्तिकरित्या करण्यात येतात. सरकारी खात्यातील चोऱ्या करण्याचे प्रकार तर याहून भयानक असतात. अशा चोऱ्या करणाऱ्या व्यक्तीला किंवा कर्मचाऱ्याला त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तसेच मंत्रालयीन पातळीवरील अधिकारी व पदाधिकारी यांचे साह्य असते.



**मोरेश्वर ब्रह्मे**
९३२६९ ३९१७६

त्यामुळे ही मंडळी सर्वांच्यादेखत चोऱ्या करण्याचा निर्लज्जपणा करतात. परिणामी समाजामध्ये याबाबतीत कसल्याही प्रकारची सुरक्षितता राहिलेली नाही हेच दिसून येते.

वास्तविक आपल्या देशात व राज्यात वीज, पाणी, अन्नधान्य याची अजिबात कमतरता नाही. कारण मानवाने जरी निसर्गाविरूद्ध जाऊन ज्या काही गोष्टी केल्या म्हणजे रस्त्यांवरील जुनी झाडे तोडली, डोंगर-टेकड्या फोडल्या, नद्यांना नैसर्गिकरित्या वाहू न दिले, कारखानदारीसारखे उद्योगधंदे करून त्यांच्या धुराड्यांमुळे व त्यांच्यापासून निर्माण होणाऱ्या दूषित पाण्यामुळे नद्या प्रदुषित केल्या इ. अनुशंगिक प्रकार केले असले तरी निसर्गाने मानवावर अवकृपा कलेली नाही. आता ज्या ठिकाणी याबाबींचा अतिरेक झाला असेल त्याठिकाणी निसर्गाने स्वत:चा समतोल राखण्यासाठी वादळ, भूकंप, पूर यांसारख्या घटना घडवून माणसाला वेळोवेळी शिक्षाही दिलेल्या आहेत; परंतु अशी परिस्थिती सातत्याने निर्माण होत नाही. तेव्हा वरीलप्रमाणे निसर्गाविरूद्ध कृत्ये करून वीज, पाणी, अन्नधान्य इ. जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करून जनतेची लूट करणारी मंडळी म्हणजे सामूहिकरित्या दरोडेखोरी करणारीच म्हणावी लागतील.

आता अशा प्रकारच्या चोऱ्या थांबविण्याचे कोणाच्याही हातात राहिलेले नाही. याबाबतीत सरकारही काही करू शकत नाही. चोऱ्या करण्याचे स्वत:हून थांबवावे असे वाटण्याची नैतिकताही या मंडळीजवळ राहिलेली नाही. तेव्हा कायदे कितीही कठोर असले तरी जो पर्यंत त्याची अंमलबजावणी तितक्याच कठोरपणे आणि प्रभावीपणे केली जात नाही. तोपर्यंत चोऱ्या ह्या होतच राहणार. हे सांगण्यासाठी कोणा भविष्यवेत्त्याची गरज नाही. अशा चोऱ्या उघडकीला आणण्यामध्ये समाजातदेखील प्रभावी यंत्रणा वा जागृकता नसल्यामुळेही अशा चोऱ्यांना आळा बसणे कठीणच होऊन बसले आहे. यासाठी काळच काय ठरविल ते ठरविल! ■

# शाळेकडून लहान मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष

**सचिन सुंबे, (लोणी काळभोर) :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत स्वच्छ भारत करण्याचा प्रयत्न चालू असताना हडपसर ते सासवड रोडवर भेकराईनगर येथे लॅक्सिकॉन या शाळेकडून लहान मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. फुरसुंगी ग्रामपंचायतीने याकडे डोळेझाक केली आहे.

लॅक्सिकॉन स्कूल ग्रामपंचायतीच्या हद्दीत अतिशय वर्दळीच्या ठिकाणी आहे. शाळेशेजारी कचऱ्याचा ढीग आहे. तेथील नागरिकरणामुळे लोक तेथे रस्त्याच्या कडेला व शाळेशेजारी कचरा टाकत आहेत. शाळेत प्रवेश करताना मुलांना अक्षरश: नाकावर व तोंडावर रूमाल ठेऊन शाळेत जावे लागते. रस्त्याच्या कडेला कचऱ्याचा ढीग असल्यामुळे जाताना येताना लोकांना त्याचा खूप त्रास होत आहे. आपण शाळेत गेलो की असे वाटते कचरा डेपोजवळ आलो आहोत. कचरा पावसाने ओला होत आहे त्यामुळे पक्षी, कुत्री व माशा त्याच्यावर ताव मारताना दिसतात. त्यामुळे रोगराई पसरत आहे.



या शाळेशी संपर्क साधला असता शाळेने सर्व खापर ग्रामपंचायतीवर फोडले. आम्ही वेळोवेळी ग्रामपंचायतीकडे कळवले आहे. पुणे महानगर पालिकेला सुद्धा कळवले आहे; पण ग्रामपंचायतीच्या हद्दीत ती शाळा असल्यामुळे आम्ही काहीही करू शकत नाही असे महानगर पालिकेने शाळेला सांगितले. शाळेचे पदाधिकारी म्हणतात, ग्रामपंचायत कधीतरी कचरा उचलण्याचे काम करते पण कचऱ्याचे ढीग तेथून बंद करण्याचे कुठलेही नियोजन करत नाही. शाळेने तिथे वॉचमन ठेवला होता; पण लोकांनी वॉचमनच्या अंगावर कचरा टाकला म्हणून शाळेने तो प्रयोग सोडून दिला. तिथे एक ओठा होता पण फक्त कठडा बाकी आहे. ओठा गायब आहे.

या संदर्भात ग्रामपंचायतीकडे विचारणा केली असता ग्रामसेवक गावडे म्हणाले, लवकरच आम्ही काचऱ्याचा ढीग तेथून हलवण्याचे नियोजन करत आहोत. हॉटेल व इतर लोकांसाठी दररोज दिवसातून दोनदा कचरागाडी फिरवण्याचे नियोजन चालू आहे. त्यामुळे कचऱ्याचे ढीग दिसणार नाहीत. शाळेजवळचा कचऱ्याचा ढीग आम्ही लवकरात लवकर हटवू.

याबाबत पालकांशी संवाद साधला असता शाळा व ग्रामपंचायत हे या विषयाकडे गंभीरपणे बघत नाहीत, आमच्या मुलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. या भागातील मंत्री विजय शिवतरे यांनी जागेवर येऊन पालकांसमोर पाहणी करावी. कचऱ्याचा ढीग बंद करावा. उज्वल भारत व उज्वल भविष्याकडे, मुलांच्या या प्रश्नाकडे गंभीरपणे पहावे.


कवी रमेश जाधव यांच्या
**‘नाते मनाशी मनाचे’**
या काव्यसंग्रहाचे प्रकाशन व निमंत्रितांचे कवी संमेलन



✲ कार्यक्रमाचे अध्यक्ष ✲
**दत्तात्रय कोहिनकर पाटील**
अध्यक्ष, विपश्यना केंद्र, पुणे

✲ प्रकाशन हस्ते ✲
**मा. आ. दीपक पायगुडे**
अध्यक्ष लोकसेवा प्रतिष्ठान

✲ प्रमुख पाहुणे ✲
**आनंद सराफ**, लेखक
**सुनिताराजे पवार**, कोषाध्यक्ष, मसाप, पुणे
**रूपाली अवचरे**, मसाप शाखाध्यक्ष, येरवडा-विश्रांतवाडी

✲ निमंत्रक ✲
**घनश्याम पाटील**
संपादक, प्रकाशक, ‘चपराक’

✲ कार्यक्रमाची वेळ ✲
**रविवार दि. २४ जुलै २०१६ रोजी सकाळी १०:३० वा.**

✲ स्थळ ✲
**महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रोड, पुणे**

www.chaprak.com

# ‘वज्र’ चित्रपटाचा रंगलेला ‘संगीत अनावरण’ सोहळा




**गायिका** श्रीपर्णा चटर्जी हिने गायलेले ‘हाय-रब्बा हुस्न ये है, जलवा है ये, सारी रात का मकसद क्या है …’ हे गाणे आणि त्यावर अभिनेत्री नृत्यांगना मानसी नाईक हिने पेश केलेली’ ‘मुजरा नृत्या’ची स्पेशल झलक यामुळे उपस्थित रसिक प्रेक्षक आनंदाने भारावून गेले आणि त्यांनीही टाळ्यांच्या गजरात त्या गाण्यावर ठेका धरला. निमित्त होते ‘विभावरी चित्र’च्या ‘वज्र’ या चित्रपटाच्या ‘संगीत अनावरण’ सोहळ्याचे. प्रमुख पाहुणे भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू यांच्या हस्ते ‘वज्र’ या चित्रपटाच्या सीडीचे शनिवारी सायंकाळी अनावरण करण्यात आले. अ. भा. मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले, अभिनेते राहुल सोलापूरकर, कार्यकारी निर्माते शंतनु देशपांडे, दिग्दर्शक मयूर करंबळीकर, संगीतकार चंद्रमोहन, अभिनेत्री मानसी नाईक, अभिनेते उल्हास आढाव आणि खास निमंत्रितांच्या उपस्थितीत पार पडलेला ‘वज्र’ चित्रपटाचा हा ‘संगीत अनावरण’ सोहळा चांगलाच रंगला.

प्रारंभी कार्यकारी निर्माते शंतनु देशपांडे यांनी आपल्या स्वागतपर प्रास्ताविकात या चित्रपटाच्या निर्मितीचा आढावा घेतला. या चित्रपटाच्या निर्मितीची प्रेरणा लेखक असलेले आपले वडील प्रा. यशवंत देशपांडे यांच्याकडून मिळाली असे सांगून ते म्हणाले, पॅरीस, जर्मनी आदी ठिकाणी चित्रीकरण झालेला ‘वज्र’ हा चित्रपट करमणुकीने भरलेला मसालापट होण्यासाठी आम्ही पुरेपूर काळजी घेतली आहे. त्यामुळे त्याला प्रेक्षकांचाही चांगला प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे असे ते म्हणाले. मानसी नाईक यांचे ‘मुजरा नृत्य’ हे या चित्रपटाचे खास आकर्षण आहे आणि त्यासाठी सर्वांनीच खास प्रयत्न केले आहेत, पडद्यावर त्याची साक्ष पटणार आहे असे त्यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू यांनी या चित्रपटाला शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री. जाजू यांच्या हस्ते यावेळी अभिनेते उल्हास आढाव, गायिका श्रीपर्णा चटर्जी, गायक अमोल घाटे, गायक निलेश पांडे, समर्थ बारी आदी चित्रपटातील कलावंतांचा सत्कारही करण्यात आला.

या चित्रपटाचे गीतकार आणि संगीतकार अशी दुहेरी जबाबदारी पार पाडणारे चंद्रमोहन यांनी आपल्या भाषणात, ‘वज्र’ची संपूर्ण टीम तरुण असल्याने त्यादृष्टीने संगीत देण्याचे माझ्यापुढे आव्हान होते व मी ते स्वीकारले. तिन्ही गाणी वेगवेगळ्या ढंगात करायचा प्रयत्न केला. मुजरा नृत्यासाठी हिंदी गीत मीच लिहिले मात्र त्यासाठी नृत्यांगना मानसी नाईक, नृत्यदिग्दर्शक बॉबी सय्यद यांनी खूप मेहनत घेतली. आशिष कुलकर्णी यांनी बागेश्री रंगात गायलेली खास पारंपरिक बंदिशही या चित्रपटात असून त्यासाठी पुण्याच्या अनव्य बँडचे सहकार्य मिळाले असे ते म्हणाले. हा चित्रपट हिंदीतही पाहायला मिळेल अशीही त्यांनी यावेळी माहिती दिली.

चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेता राहुल सोलापूरकर, नृत्यांगना, अभिनेत्री मानसी नाईक यांनी आपली मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी गायिका श्रीपर्णा चटर्जी, गायक अमोल घाटे, यांनी चित्रपटातील गाणी सादर करून उपस्थित प्रेक्षकांची छान करमणूक केली. पल्लवी चौधरी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ■

## नात्यांतील बदलत्या स्वरुपांना जोडणारा ‘& जरा हटके’

**नात्यांचे** बदलत जाणारे स्वरूप, या बदलत जाणाऱ्या नात्यांमध्ये साहजिकच वाढलेला दुरावा अशी आजच्या मॉडर्न युगातली नात्यांची समीकरणे आहेत. काळानुरूप बदलत गेलेल्या या नात्यांमधली भावनिक गुंतागुंत आपल्याला ‘अँन्ड जरा हटके’ या आगामी चित्रपटात पाहायला मिळणार आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीतील नावाजलेली निर्मितीसंस्था इरोज इंटरनॅशनल तसेच मराठी चित्रपटसृष्टीला सुपरहिट चित्रपट देणारे दिग्दर्शक रवी जाधव या दोघांनी मिळून या चित्रपटाची निर्मिती केली आहे. नात्यांमधले बदलते स्वरूप दाखवणारा हा चित्रपट येत्या २२ जुलै रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



‘अँन्ड’ हे अक्षर दोन वेगवेगळ्या शब्दांना एकत्र करणारे असल्यामुळे या चित्रपटात ‘हटके’ लव्हस्टोरी बघायला मिळणार आहे. एका मध्यमवयीन स्त्री-पुरूषाच्या सुंदर नात्याभोवती सिनेमाची कथा फिरतेय. मध्यमवयात पुन्हा विवाह करण्यासारखा धाडसी निर्णय हे जोडपं घेतं. मग त्याचं हे नातं त्यांची मुलं कसे स्वीकारतात, यावर हा चित्रपट अधोरेखित करण्यात आला आहे. त्यांच्यातील वाद, हेवेदावे आणि याबरोबरच ओघाने येणाऱ्या जनरेशन गॅपचा समतोल ‘अँन्ड जरा हटके’ या चित्रपटामध्ये हटकेच पाहायला मिळणार आहे.

मिताली जोशी यांनी या चित्रपटाची कथा लिहिली असून प्रकाश कुंटे यांनी दिग्दर्शन केले आहे. ‘कॉफी आणि बरंच काही’ या चित्रपटातून आपले दिग्दर्शकीय पदार्पण करणारे प्रकाश कुंटे यांनी या चित्रपटात एका कुटुंबाची हृदयस्पर्शी कथा मांडली आहे. या सिनेमातील ‘सांग ना’ हे रोमँटिक गाणे मंगेश कांगणे लिहिले आहे. शैल हाडा आणि हमसीका अय्यर या जोडगोळीने गायलेले हे गाणे मृणाल कुलकर्णी आणि इंद्रनील सेनगुप्ता यांच्यावर चित्रित आले आहे.

याच चित्रपटातील ‘उमलून आले…’ हे नात्यांमधील टप्पे दाखवणारं हे गाणं संदीप खरे यांनी लिहिले असून शाशातिरुपती यांनी हे गाणं स्वरबद्ध केले आहे. मृणाल कुलकर्णी, इंद्रनील सेनगुप्ता, सिद्धार्थ आणि शिवानी या चौघांवर हे गाणं चित्रित करण्यात आलं आहे. आदित्य बेडेकर हे या चित्रपटाचे संगीतदिग्दर्शक आहेत. वासुदेव राणे यांनी छायांकन केले असून मयूर हरदास यांनी या चित्रपटाचे संकलन केले आहे. आधुनिकीकरणाच्या या युगात वेगाने बदलत असलेली नात्यांची संकल्पना आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या समस्या प्रत्येकांच्या घराघरात पाहायला मिळतात. अशावेळी नात्यांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी हा महत्त्वाचा असतो, मात्र या चित्रपटातला इतरांहून जरा हटकेच असल्यामुळे ‘अँन्ड जरा हटके’ हा चित्रपट कुतूहलाचा विषय ठरत आहे. बंगाली अभिनेता इंद्रनील सेनगुप्ता या चित्रपटातून मराठीत पदार्पण करीत आहे. इंद्रनील सोबतच मृणाल कुलकर्णी, सिद्धार्थ मेनन, शिवानी रांगोळे, स्पृहा जोशी, सुहास जोशी, सोनाली आनंद, संदेश कुलकर्णी हे कलाकारही या चित्रपटात पाहायला मिळणार आहेत. ■

## ‘हाफ तिकिट’मधून प्रियांका बोसची मराठीत एंट्री

**सध्या** मराठी चित्रपटांमध्ये होणाऱ्या नवनव्या प्रयोगांमुळे आणि त्यांना मिळणाऱ्या आंतराष्ट्रीय सन्मानांमुळे आता मराठीची जाणीवपूर्वक दखल घेण्यात येऊ लागली आहे. अनेक अमराठी अभिनेते आणि अभिनेत्री मराठी चित्रपटांमध्ये काम करण्यासाठी इच्छुक आहेत. अनेक राष्ट्रीय – आंतराष्ट्रीय चित्रपटांमधून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणारी गुणी बंगाली अभिनेत्री प्रियांका बोस आता २२ जुलै रोजी प्रदर्शित होणाऱ्या ‘हाफ तिकिट’ या मराठी चित्रपटामधून मराठीत पदार्पण करीत आहे.

आशय व सादरीकरणात अनेक यशस्वी प्रयोग करणारे दिग्दर्शक समित कक्कड ‘हाफ तिकिट’च्या माध्यमातून दोन लहान मुलांच्या स्वप्नांचा अनोखा प्रवास घेऊन येणार आहेत. लहान मुलांचं भावविश्व, त्यांची भाषा, समज, जगण्याची पद्धत, या सगळ्यांचं थक्क करणारं दर्शन या चित्रपटात असणार आहे. कलाकारांच्या वेगळ्या भूमिका व गुलदस्त्यात असणारी एका सुप्रसिद्ध कलाकाराची एन्ट्री असं ‘फुल ऑन पॅकेज’ असणारा हा सिनेमा प्रेक्षकांसाठी जबरदस्त ट्रीटच असणार आहे. ‘चल चल, रुबाब पाहिजे…’, ‘भरले रे…’ , ‘लब्बाड घबाड…’ अशी चार गाणी या चित्रपटात आहेत.

शुभम मोरे व विनायक पोतदार या दोन बालकलाकारांसह भाऊ कदम, उषा नाईक, शशांक शेंडे, जयवंत वाडकर, प्रियांका बोस, कैलास वाघमारे आदी कलाकारांच्या भूमिका आहेत.

‘हाफ तिकिट’ या चित्रपटात प्रियांकाने आईची भूमिका साकारली आहे. वेगळा दृष्टिकोन देणाऱ्या ‘हाफ तिकिट’ या चित्रपटातील माझी भूमिका मला भावल्यामुळे या चित्रपटात मी काम केलं आहे. दिग्दर्शक समीत कक्कड याने अतिशय साधी सरळ गोष्ट या चित्रपटातून मांडली आहे. जी गोष्ट प्रेक्षकांना नक्कीच भुरळ पाडेल असा विश्वास प्रियांकाने व्यक्त केला आहे. आजवर अनेक यशस्वी चित्रपटांची निर्मिती व प्रस्तुती करणाऱ्या व्हिडिओ पॅलेसने ‘हाफ तिकिट’च्या माध्यमातून समृद्ध आशयाचा हटके चित्रपट आणला आहे.

चित्रपटाची कथा एम माणिकदान यांची असून लेखन ज्ञानेश झोटिंग यांचं आहे. गीतलेखन क्षितिज पटवर्धन यांनी केले असून संगीताची जबाबदारी जी. वी. प्रकाश यांनी सांभाळली आहे. छायाचित्रण संजय मेमाणे यांचे असून संकलन फैझल इम्रान यांचं आहे. साऊंड डिझाइन अनमोल भावे यांनी केलं असून कलादिग्दर्शन वासू पाटील यांचं आहे.

# आम्ही फक्त ऐकत असतो, आमुची खुशाली



**गुन्हेगाराला** पाठीशी घालणे किंवा त्याच्या गुन्ह्याचे पुरावे लपवणे, हा सुद्धा तितकाच गंभीर गुन्हा मानला जातो. कुठल्याही फौजदारी खटल्यात अशा लोकांनाही शिक्षा होत असते. तो कायदा जर मान्य करायचा असेल, तर कुठल्याही घातपाती दहशतवादी गुन्ह्यामध्ये बहुतेक देशातील सरकारे व राज्यकर्त्यांना गुन्हेगार मानावे लागेल. कारण सातत्याने जगाला जो दहशतवाद भेडसावतो आहे, त्यामागे इस्लामी धर्माची शिकवण देणाऱ्या संस्था व संघटना आहेत. प्रत्येक वेळी जेव्हा अशी घटना घडते, तेव्हा त्याच्या गुन्ह्यावर पांघरूण घालण्यासाठी अशा संस्था व संघटनांसह त्यांचे पाठीराखेही पुढे येत असतात आणि विविध देशांचे राज्यकर्तेही त्यांच्याच सुरात सूर मिसळून दहशतवादाला धर्म नसतो, अशी पोपटपंची करीत असतात. जगातल्या कुठल्याही देशातला असा दहशतवादी हल्ला वा हत्याकांड बघितले, तर त्यामागची प्रेरणा धार्मिक असल्याचे स्पष्टपणे नेहमी समोर आले आहे. मग तो हल्ला ब्रुसेल्स, पॅरीसमधला असो किंवा फ्रान्सच्या नीस शहरातली ताजी घटना असो. यातला जिहादी ट्युनिशियातून येऊन स्थायिक झालेला मुस्लिम होता. ढाक्यातील बेकरी हॉटेलात झालेल्या घटनेतील हल्लेखोरांनी मुस्लिम नसलेल्यांना कुराणाच्या आयता म्हणायची सक्ती करून व ते बिगरमुस्लिम असल्याची खातरजमा करूनच ठार मारले. साहजिकच इस्लाम ची शिकवण काय असेल, ती असेल; पण जे असे हिंसाचार व हत्याकांड करीत आहेत, त्यांना मिळणारी इस्लामची धार्मिक शिकवण हिंसाचारी आहे. त्यापासूनच प्रेरणा घेऊन हा भयंकर हिंसाचार निर्माण झालेला आहे. धर्माची शिकवण काय आहे याचे मूल्यमापन तथाकथित धार्मिक पंडितांनी करण्यापेक्षा जे त्याचे बळी होतात, त्यांनी करायला हवी. कारण अशा शिकवणीचे दुष्परिणाम ज्यांना भोगावे लागत आहेत, त्यांनाच सुरक्षित जगण्यासाठी उपाय योजावे लागत आहेत.

एका निरपराध माणसाला मारला तरी तरी अवघ्या मानवतेची हत्या केली, अशी इस्लामची शिकवण असल्याचे आपण वाहिन्यांवर प्रत्येक घटनेनंतर ऐकत असतो; पण अनुभव तसा आहे काय? एक गुन्हेगार मोकाट सुटलेला असतो आणि त्याला रोखण्याचे प्रयत्न होत नाहीत. म्हणून तो मानवतेसाठीच मृत्यूचा सापळा बनलेला असतो. हाच सार्वत्रिक अनुभव आहे. अशा गुन्ह्यामध्ये त्याचा व्यक्तीगत लाभ फायदा कुठला असल्याचे कोणी सिद्ध करू शकलेला नाही. कसाब असो किंवा याकुब मेमन असो, त्यांनी कुठल्या आर्थिक लाभासाठी हत्याकांड केल्याचा पुरावा समोर येऊ शकलेला नाही; पण त्यांनी धार्मिक कृत्य म्हणून अशी हिंसा करताना, आपलेही जीवन पणाला लावलेलेच दिसते. याचा अर्थ असा की त्यांच्यासाठी कुठलेही व्यक्तिगत स्वार्थ, पैसा धनसंपत्ती दुय्यम असून, धर्माचे पवित्र कार्य सर्वोपरी आहे. हे सर्वोपरी कार्य कुठले तर जे बिगर मुस्लिम आहेत, त्यांचे हत्याकांड करताना आपणही मृत्यूला कवटाळणेच होय. थोडक्यात अशी हिंसा करणारे कुठल्या तरी पवित्र कार्याला प्रवृत्त होऊन हिंसा करीत असतात आणि त्यांना ते उदात्त कार्य वाटत असते. मग त्यांच्या हाती कुठले स्फोटक वा हत्यार असण्याचीही गरज उरत नाही. विविध हल्ल्यांचा अभ्यास केला तर कुठलाही जिहादी अमुकतमुक हत्यारामुळे विघातक ठरलेला नाही. त्याच्या हाती असलेले वा सहज उपलब्ध होऊ शकणारे साधन, त्याने हत्याकांडासाठी वापरलेले आहे. त्याला कुठल्याही कारस्थानी सज्जतेची गरज भासलेली नाही. एकांडा शिलेदार किंवा मोजक्या हल्लेखोरांनी स्वयंभूपणे योजलेले हल्लेच दिसून येतील. म्हणूनच मुद्दा त्यांच्या संघटनेचा, एकत्रित प्रयत्नांचा किंवा कारस्थानी कारवाईचा नाही. सर्वात चिंतेचा विषय या हल्ल्यामागील प्रेरणेचा आहे. ती प्रेरणाच आज जगाला भेडसावते आहे. ती प्रेरणाच दहशत बनलेली आहे; पण त्याबद्दल कोणी बोलयलाही राजी नाही.



भाऊ तोरसेकर
९७०२१३४६२४

मुस्लिम विचारवंतांचा एक गट असा युक्तिवाद करतो की, हे वाट चुकलेले मुस्लिम आहेत आणि त्यांनी जसा अर्थ लावला तशी धर्माची शिकवणच नाही. दुसरा मुस्लिम पंडीतांचा असाही गट आहे की, तो अशा हिंसक कारवायांची वकिली करताना त्याला स्थानिक राजकीय, सामाजिक कारणे चिकटवत असतो. जणू तशी सामाजिक स्थिती नसती, तर असे हल्लेखोर हिंसेला प्रवृत्त झालेच नसते, असा हा बचाव असतो. मुस्लिमांवर अन्याय होत असतो म्हणून ते न्यायासाठी हत्यार उचलतात, असा यातला लबाड युक्तिवाद आहे. हाच युक्तिवाद दिर्घकाळ इस्त्रायल पॅलेस्टाईनच्या वादात वापरला गेला आणि आता त्याने अक्राळविक्राळ जागतिक रूप धारण केले आहे. जगात अनेक समाजगट असे आहेत की त्यांनाही विविध भागात व प्रसंगी सामाजिक अन्यायाला सामोरे जावे लागले आहे; पण त्यांनी हत्यार हाती घेऊन निरपराधांचे हत्याकांड केल्याचे आढळत नाही. प्रस्थापित सत्तेविरोधात हिंसाचार केला असेल; पण धर्माच्या रक्षणार्थ उभे राहताना सामाजिक एकजूट दाखवलेली नाही. अफगाण वा इराक येथे जिहादच्या नावाने हिंसा माजवणाऱ्यात जगातल्या कुठल्याही देशातून आलेले मुस्लिम सहभागी आहेत. त्यांच्यावर मातृभूमित कुठला सामाजिक राजकीय अन्याय झाला आहे? तो त्यांच्यावर झालेला नसून त्यांच्या परकीय धर्मबांधवांवर झालेला अन्याय आहे; पण जगात कुठेही असा अन्याय झाल्याची बातमी आली की, कुठलाही मुस्लिम समाज रस्त्यावर येतो ही वस्तुस्थिती आहे. चार वर्षापूर्वी ब्रह्मदेशातील मुस्लिमांवर अन्याय झाल्याची बातमी आली आणि मुंबईत रझा अकादमी या मुस्लिम संघटनेने मोर्चा काढला. त्यात नागरिक, पोलीस व महिलांवर हल्ले झाले. त्यामागची प्रेरणा वा कारण कोणते होते? कुणा मुंबईकराने ब्राह्मी मुस्लिमावर अन्याय केला नव्हता. तरीही या हिंसाचाराचे चटके मुंबईला बसले. त्याची प्रेरणा धर्म नाही तर कुठली होती?

ही शुद्ध दिशाभूल आहे. ती करणारे मुस्लिम पंडित दुय्यम आणि त्याचीच री ओढणारे अन्य सामाजिक राजकीय जाणकार खरे गुन्हेगार आहेत. कारण तेच गुन्हेगारांना पाठीशी घालत असतात, असे जिहादी हिंसेचे गुन्हे करणाऱ्यांच्या प्रेरणेला, शिकवणीला झाकून सामान्य माणसाची दिशाभूल करणारा खरा गुन्हेगार नाही काय? वयात आलेल्या तरूणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून कोठीवर विकणारा अधिक गुन्हेगार असतो. कारण तो विश्वासघाताने त्या मुलीला बलात्कारी व अत्याचारी लोकांच्या हवाली करत असतो. म्हणूनच जिहादी हिंसेच्या मागची धार्मिक प्रेरणा नाकारून लोकांना गाफील करणारे जिहादींपेक्षा मोठे गुन्हेगार आहेत. पॅरीस व ब्रुसेल्सच्या हल्ल्यानंतर त्यामागे धार्मिक प्रेरणा नाही किंवा त्या शहरात वावरणारे मुस्लिम संशयित धोकादायक नाहीत, अशी हमी देणारेच यातले खरे गुन्हेगार नाहीत काय? कारण दुर्घटनेत बळी पडलेले व पडणारे बहुतांश लोक अशाच दिशाभूलीचे बळी आहेत. कारण अशी बौद्धिक दिशाभूल करणाऱ्यांनी त्यांना अलगद नेऊन मृत्यूच्या सापळ्यात सोडलेले असते. घटना कुठल्या देशात वा शहरात घडली त्याला अजिबात महत्त्व नाही. जिथे कुठे अशा धार्मिक शिकवणीने प्रवृत्त झालेले जिहादी असतील, तिथे असे हत्याकांड कधीही होऊ शकते. ते करण्याचे मोकाट रान मानवाधिकारांनी हल्लेखोरांना बहाल केलेले आहे. कायदेशीर बंदुक हाती असलेल्या पोलिसाने चुकून कुणाचा बळी घेतला तर त्याची ससेहोलपट करणाऱ्या कायद्यांनी सुरक्षेच्या मुसक्या बांधलेल्या आहेत. त्यामुळेच असे कोणी जिहादी मौजमजा म्हणून आपली कधीही हत्या करू शकतात. मरायला ते घाबरत नाहीत कारण पृथ्वीवर जगण्यापेक्षा जन्नतमध्ये जाण्याची त्यांना घाई झालेली आहे. जाताना अन्य किती निरपराध मारता येतील, इतकीच त्यांना विवंचना असते. ते गुन्हेगार नाहीतच. त्यांची पाठराखण करणारा बुद्धिवाद, युक्तिवाद खरा गुन्हेगार आहे. मग सुरेश भटांच्या कवितेतील ओळी आठवतात,

**आम्ही फक्त ऐकत असतो, आमुची खुशाली**

■

**नम्र आवाहन**

**सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 'चपराक'चे सभासद आपणही अवश्य व्हा!**

**वार्षिक वर्गणी** ▶ **साप्ताहिक : २०० रु.**
**मासिक : ५०० रु.**

**आमच्या www.chaprak.com या वेबसाईटवरून ऑनलाईन पैसे भरूनही आपणास सभासद होता येईल.**

सभासद होण्यासाठी आणि वर्गणीचे नुतनीकरण करण्यासाठी संपर्क : **तुषार उथळे पाटील**
**दूरध्वनी : ०२०-२४४६०९०९, ९५५२८५८१००**

# शंभरीच्या तरूणाची लेखनगाथा







'वय देहाला असतं मनाला नाही. मनानं तरूण असणारी माणसं कधीच वृद्ध होत नाहीत. जीवन सुरेल आहे, आपल्याला ते सुरात गाता आलं पाहिजे. जग सुंदर आहे, डोळ्यात जीव ओतून ते पाहता आलं पाहिजे. नाविन्याच्या खिडक्या उघड्या ठेवून जगत गेलं की जगण्याचं कधी ओझ होतं नाही...'

असं कोण म्हणतयं? तर वयाच्या शंभरीच्या उंबरठ्यावर असलेले दुर्गानंद गायतोंडे! कोण हे गायतोंडे? तर ते लेखक आहेत. २९ मार्च १९१९ चा त्यांचा जन्म. जन्मस्थळ हुबळी. कराची आणि मुंबईतून त्यांनी एम. ए., एल. एल. बी. केलं. केंद्र सरकारमध्ये वरिष्ठ पदावर नोकरी केली. ब्रिटिश, डच आणि अमेरिका येथील आंतरराष्ट्रीय कंपन्यात बऱ्याच वरच्या हुद्यावर त्यांनी नोकरी केली. त्यानिमित्त नागपूर, सिमला, दिल्ली, मुंबई, कोलकत्ता आणि दुर्गापूर येथे त्यांचे वास्तव्य होते. १९८० ला ते निवृत्त झाले. निवृत्तीनंतर शांत बसतील ते गायतोंडे कसले. त्यांनी देशातल्या अनेक कंपन्यात व्यवस्थापक आणि कामगारांसाठी कार्यशाळा घेतल्या. त्याकाळात त्यांनी अनेक इंग्रजी पुस्तके लिहिली. वयाच्या नव्वदीनंतर त्यांना मराठी पुस्तके लिहिण्याची प्रेरणा झाली. मग त्यांनी लेखन, समाजकार्य, गरीब विद्यार्थ्यांना शिकवण आणि आर्थिक मदत, अध्यात्म क्षेत्रात संशोधन चालू ठेवले. या आदर्श कर्मयोग्याची वयाच्या नव्वदीनंतर मराठीतील चौदा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

विषयांची विविधता, अभ्यासपूर्ण लेखन आणि थेट भिडणारी भाषा हे त्यांच्या लेखनाचे वेगळेपण. म्हणूनच 'वय देहाला असतं, मनाला नाही' असं ते ठामपणे सांगू शकतात. साहित्यात वय, जात, धर्म, प्रांत असे निकष नसतात. ते असूही नयेत; मात्र दुर्दैवाने असे घटक प्रकाशन क्षेत्रात आल्याने हे क्षेत्र काळवंडत चाललं आहे. अशा परिस्थितीत दुर्गानंद गायतोंडे यांच्यासारख्या लेखकांचा आदर्श नवोदितांनी घ्यायला हवा.

गायतोंडे यांच्या पुस्तकांच्या शीर्षकावरूनही त्यांच्या लेखन सामर्थ्याचे वैविध्य सहजपणे ध्यानात येईल. 'सुंदरा मनामध्ये भरली,' 'आभास', 'विनोदाच्या फुलझड्या', 'गूढ', 'कवडसे', 'पराधीन आहे पुत्र मानवाचा', 'ओंकारमय व्हा', 'भावलेल्या व्यक्ती', 'थरार', 'अंतरीच्या नानाकळा', 'पुनर्जन्मा ऐक तुझी कहाणी', 'येरा गबाळ्याचे काम नोहे' ही त्यांची काही पुस्तके! हा सर्व संच पुण्यातील 'उत्कर्ष प्रकाशन'च्या सुधाकर जोशी यांनी आत्मियतेने प्रकाशित केला आहे. गायतोंडे यांच्यासारखे ज्येष्ठ आणि अनुभवी लेखक व 'उत्कर्ष'सारखी मान्यवर प्रकाशन संस्था यामुळे मराठीत सकस साहित्याची भर पडली आहे.

गायतोंडे म्हणतात, 'मी संशोधनाचा भोक्ता आहे. आपल्याकडे सर्व शास्त्रात आणि विज्ञानात सतत संशोधन चालू असतं; पण अध्यात्मात तसं काही दिसून येत नाही. एखादा अपवाद असेलही; पण त्याने जे काही निष्कर्ष काढले असतील ते माझ्या वाचनात आले नाहीत.'

''सत्ययुगात हनुमानाची अनेक देवळे आणि हजारो भक्त होते. द्वापारयुगात देवही कमी झाले आणि भक्तही कमी झाले आणि आता कलियुगात तर कहरच झाला. नावापुरतीच देवळं उरली आणि नावापुरतेच भक्त राहिले आहेत. परवा रात्री तर एक चोवीस वर्षांची मुलगी देवळात आली आणि मला म्हणाली, हाय हनु!'' अशी हनुमानाची आत्मनिवेदनात्मक दंतकथा सांगत गायतोंडे यांनी समाज किती बदलला आहे हे दाखवून दिले आहे. त्यातूनच त्यांनी 'पुनर्जन्मा, ऐक तुझी कहाणी' आणि 'संशोधनात्मक ओंकारमय व्हा' ही पुस्तके लिहिली. त्यांनी ५६ प्रश्नांची उत्तरे ३५ व्यक्तिंकडून घेतली आणि त्याचे निष्कर्ष त्यांच्या पुस्तकात दिले आहेत. 'वयानुसार डोळे साथ देत नसले तरी ही 'ओम'ची श्रद्धा आहे' असे त्यांना वाटते.

त्यांच्या 'आभास' या पुस्तकाचे मनोगत तर प्रत्येक नवोदित लेखकाने पुन्हा पुन्हा वाचायला हवे. यात त्यांनी नवशिक्या लेखकांची आणि प्रकाशकांची कथा व व्यथा प्रांजळपणे मांडली आहे. नव्वदीनंतरही मराठी प्रकाशकांचे त्यांना दुर्दैवी अनुभव आले. मराठी भाषेच्या संवर्धनाचा ठेका आपणच घेतलाय अशा अविर्भावात मिरवणाऱ्या पुण्या-मुंबईतील प्रकाशकांना दुर्गानंद गायतोंडे यांनी दिलेली ही सणसणीत चपराकच आहे. 'एक वर्ष बिझी आहोत', 'पु. ल. देशपांड्यांचं पुस्तक हाती घेतलं आहे; नंतर आपलंच घेऊ', 'तुम्ही पुस्तक दिलं होतं हे आठवतचं नाही','या वर्षाचे कॅलेंडर भरले आहे. तुम्ही जानेवारीत येता का?', 'प्रकाशन हा आमचा जोडधंदा आहे. त्यामुळे पैसे दिले तर पुस्तक करू' ही व अशी सगळी उत्तरे त्यांना वयाच्या नव्वदीनंतर ऐकायला मिळाली. मग त्यांची गाठ पडली 'उत्कर्ष प्रकाशन'च्या सुधाकर जोशी यांच्याशी. जोशीकाकांनी मात्र प्रकाशकांच्या या उर्मटपणाला अपवाद ठरत गायतोंडे यांची पुस्तके सुबकरित्या प्रकाशित केली आहेत.

'भावलेल्या व्यक्ती' या पुस्तकात त्यांची ६२ वर्षांची सहचरी मीरा, राजदूत आप्पासाहेब पंत, महात्मा गांधींच्या निकटच्या सहकारी सुशिला पै, उत्तम आणि मिश्किल शिक्षक बापू प्रभावळकर, परिस्थितीवर मात करणारी शरयु कुंटे, चीफ एक्झिक्युटीव्ह ऑफिसरचा एका बाईने केलेला अंध:पात अमरसिंग, मालकाच्या घरात स्वत:चं बाळंतपण करणारी कुमारिका शेवंता माळी आणि इतर चार जणांचा समावेश केला आहे. 'कवडसे' या पुस्तकातही भारताचे न्यायमूर्ती यशवंत चंद्रचुड, कुमार गंधर्वांची पहिली पत्नी भानुमती कोमकल्ली, असंख्य लोकांचे श्रद्धास्थान माताजी निर्मला देवी, सी. पी. आयचे जनरल सेक्रेटरी ए. बी. बर्धन, आंतरराष्ट्रीय कंपनी नीतीचे सर्वेसर्वा एच. प्रॅट आणि इतर चार जणांची ओळख करून दिली आहे.

कथा, रहस्यमय कादंबरी, विनोदी लेख, गूढ लेखन, संशोधनात्मक, अध्यात्मिक, व्यक्तिचित्रणात्मक अशा चौफेर विषयांवर सशक्तपणे लेखणी चालविणाऱ्या दुर्गानंद गायतोंडे यांचा पुण्याच्या महापौरांच्या हस्ते सत्कार झाला आहे. शारदा ज्ञानपीठ आणि सिक्कीमच्या राज्यपालांनीही त्यांचा गौरव केला; मात्र इतके मोठे योगदान देऊनही आपल्या राज्यसरकारला त्यांचा विसर पडलेला दिसतोय. फुटकळ लेखकांना अनेक महत्त्वपूर्ण पुरस्कार देऊन गौरविणाऱ्या वशिलेबाज सरकारने आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या संस्थांनी त्यांची दखल घ्यावी असे वाटते.

दुर्गानंद गायतोंडे यांच्याकडे पाहून व्यक्तिश: मला लोककवी मनमोहन नातू यांची आठवण येते. प्रतिभावंतांची उपेक्षा हा विषय युगानुयुगे चालतच आलेला आहे. त्या प्रवृत्तीला फटकारताना मनमोहन म्हणाले होते, 'उद्याचा कालिदास अनवाणी पायाने जात असेल; तर त्यात अब्रू त्याची नाही राजा भोजाची जाते.' शंभरीच्या घरात असलेल्या आणि मुख्य म्हणजे अजूनही लिहिते असलेल्या दुर्गानंद गायतोंडे यांची दखल किमान आपल्याकडील साहित्य संस्थांनी घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि वयाची बंधने झुगारून देत आजही अखंडपणे साहित्यसेवा करत असल्याबद्दल गायतोंडे यांचे अभिनंदन करतो.

**(दुर्गानंद गायतोंडे यांच्या सर्व मराठी पुस्तकांसाठी संपर्क 'उत्कर्ष प्रकाशन' पुणे- ९८२२४१००३७)**

■ **घनश्याम पाटील**
७०५७२९२०९२



# दृष्टी



**नजर**, पहाणे आणि दृष्टी यात फार फरक आहे. नजर म्हणजे डोळ्यात पहाणे, नजर म्हणजे वाईट दृष्टीने पहाणे वा विशिष्ट दृष्टीने पहाणे, पहाणे म्हणजे डोळ्यात पहाणे मात्र या सगळ्यांपासून दृष्टी हा शब्द वेगळाच आहे. दृष्टी म्हणजे दिसणे हे योग्य असले तरी दृष्टी म्हणजे (व्हिजन) म्हणजे दृष्टीकोन. प्रत्येक गोष्टीकडे पहाण्याची प्रत्येकाची दृष्टी वेगळी असते; आणि चांगली दृष्टी ठेवणारा म्हणजे 'पॉझिटीव्ह ॲटीट्यूड' असणारा माणूस आयुष्यात नेहमी यशस्वी होतो. नकारात्मक दृष्टिकोन असणारी व्यक्ती जीवनात कधीच यशस्वी होऊ शकत नाही.

प्रत्येक व्यक्तिला विशिष्ट दृष्टी असते. एखादी गाय पाहिल्यानंतर लहान मुलगा, एखादी स्त्री, एखादा तरूण, वृद्ध इसम हे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून गाईकडे पाहतील. एवढेच कशाला दोन तरूणांची दृष्टी सुद्धा सारखी असलेच असे नाही. एखादा मासा पाहिल्यानंतर एकाला तो पाण्यात पोहताना किती छान दिसतो असे वाटेल तर दुसऱ्याला तो खायला मिळाला तर काय बहार येईल असं वाटत असतं. प्रत्येकाचा प्रत्येक गोष्टीकडे पहाण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. प्रत्येकाची दृष्टी वेगळी असते. मात्र ज्याला दूरदृष्टी असते तो माणूस आयुष्यात कधीही यशस्वी होणार नाही. प्रत्येक घटना, प्रत्येक गोष्ट तो चाणाक्षतेने पहात असतो. कसं वागल्याने काय होईल ह्याची कल्पना करीत असतो. एकवेळेस दूरदृष्टी नसेल तर चालेल; पण माणसाला दृष्टी मात्र आवश्य हवी. आपला स्वत:चा एक वेळ विचार हवा. वेगळा अभ्यास हवा. कुठलीही गोष्ट नजरेआड होण्यापूर्वी पहायला हवी. केवळ 'दृष्टीआड सृष्टी' असं म्हणून आता चालणार नाही. डोळ्याआड घडणाऱ्या घडणाऱ्या गोष्टी देखील आपल्याल माहीत असायला हव्या. अन्यथा वेगळेच लोक फायदा घेऊन जातात. तुमच्या कष्टाचं श्रेय दुसराच कोणी घेऊन जातो. ह्याचं कारण तुमची दृष्टी कमी पडते. मंत्रतंत्राच्या साहाय्याने दुसऱ्याच्या वाईट नजरेचा प्रभाव काढला जातो त्याला दृष्टी काढणे असे म्हणतात. एखाद्याची नजर वाईट असते. त्याची नजर लागू शकते. त्यामुळे मंत्राच्या साहाय्याने ही दृष्टी काढली जाते. काही कारण नसताना लोक वाईट नजर, वाईट दृष्टी का ठेवतात हे न उमजणारं कोडं आहे. त्या सगळ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोनच विकृत असावा.



शब्दतरंग

सदानंद भणगे, नगर
९८९०६२५८८०

दृष्टी हा शब्द ज्या दृष्टिने बघावा त्या दृष्टिने त्याचा अर्थ बदलतो बघा. नुसतं दृष्टी घालणे म्हटलं की डोळ्यांनी खूणा करणे असा अर्थ होतो. तर दृष्टिखालून घालणे म्हटलं की पहाणे असा होतो. म्हणजे एखादी उपवर मुलगी असेल तर तिचे नातेवाईक म्हणतात. एखदी मुलगी दृष्टिखालून तर घाला म्हणजे एकवार पाहून घ्या असे म्हणतो. तर दृष्टीस पडणे ह्याचा अर्थ पाहिले जाणे म्हणजे जाता जाता अचानक काही दृष्टीस पडते. उदाहरणार्थ पोलिसांना शोधता शोधता अचानर चोर दृष्टीस पडून जातो. एखादं अचंबित होणारं दृष्य पाहिलं की माणसाची दृष्टी फाटते म्हणतात. अचानक उसळलेली दंगल पाहून दृष्टी फाटते. तर डोळ्यात न मावणारा अथांग सागर पाहून वाटत आपली दृष्टी कमी पडतेय. जेव्हा माणसाच्या आकांक्षा, अपेक्षा वाढत जातात तेव्हा दृष्टी फाडणे असाही वाक्प्रचार वापरला जातो.

एखादी व्यक्ती अतिपरिणामाची होते तेव्हा दृष्टी मरणे हा वाक्प्रचार वापरला जातो. त्यावेळी वागण्यात जास्त मोकळेपणा येतो. ओळख दाखवायची नसली तर दृष्टी चोरली ही जाते. तरीही अचानक दृष्टादृष्ट होतेच आणि क्वचित दृष्टी खाली जाते. अटीतटीची भांडण झाल्यानंतर ''चल चालता हो इथून, दृष्टीस पडू नकोस माझ्या'' असही सुनावलं जातं.

एखादी गोष्ट मुद्दाम दाखवायची असते किंवा दाखवली जाते तेव्हा ती दृष्टीस पाडली जाते. म्हणजेच दाखवली जाते. अनेक प्रेमिकांना एकमेकांना भेटता येत नाही तेव्हा त्यांना दृष्टीभेटीवरूनच समाधान मानावे लागते. मला वाटतं माझ्या दृष्टीने दृष्टी विषयावर आपण खूप मोठ्या प्रमाणावर दृष्टीक्षेप टाकला नाही? ■

# असेही बंधुप्रेम!

**रविवारी** कार्यक्रम आहे... तुम्हाला यायचं आहे... संदिप खरे यांना आपण पहिला कवी राजा बडे पुरस्कार प्रदान करतोय... आणि हो... माझ्या मूळ इंग्लिश पुस्तकाचा 'ओशन ॲन्ड क्लाऊडस्'चा मराठी अनुवाद... 'मी दर्यावर्दी मी आकाशगामी' प्रकाशित होत आहे याचवेळी. त्यामुळे तुम्हाला कार्यक्रमाला यायचंच आहे.



राजा बढे

हा कार्यक्रम आयोजित करणारे चंद्रकांत उर्फ बबन बढे... भारतीय नौदल आणि एअर इंडिया इंटरनॅशनल एअरलाईन्स अशा दोन्ही ठिकाणी काम केलेले बढे सर... आणि 'ऑशन ॲन्ड क्लाऊडस्' हे पुस्तक म्हणजे त्यांचं आत्मकथन. चंद्रकांत बढे सरांची दुसरी ओळख म्हणजे... ते संपादक, चित्रपट अभिनेते, गद्यलेखक, नाटककार, कादंबरीकार, मराठी कवी, गीतकार आणि ज्यांची 'चांदणे शिंपीत जाशी चालता तू चंचले', 'कोणा कशी कळावी, वेडात काय गोडी', 'जय जय महाराष्ट्र माझा', 'डोळे मोडीत गवळण राधा माझिया माहेरा जा', 'नको मारू खडा' ही व अशी अनेक गीते त्यांनी लिहिली.



सुवर्णा जाधव, मुंबई
९८१९६२६६४७

कवी राजा बढे हे धाकटे बंधू! राजा बढेंच्या नावाने पुरस्कार सुरू केला होता. प्रथम पुरस्काराचं वितरण होतं... त्याचं आमंत्रण आणि आमंत्रण देणारी उत्सवमूर्ती चंद्रकांत बढे, वय वर्षे ८५. तरूणालाही लाजवेल असा उत्साह.

कार्यक्रम खूप छान आयोजित केला होता. चंद्रकांत बढे सर म्हणजे अगदी लाघवी व्यक्तिमत्त्व, आदबशीर वागणे, बोलणे, शब्द अगदी तोलून मापून बोलणार. समोरच्याला मान देऊनच संभाषण करणार. अशा ८५ वर्षांच्या बढे सरांनी कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाच्या सुरूवातीला राजा बढे यांची गाजलेली गाणी, विविध गायक-गायिकांनी गायली. श्रोत्यांना त्या गाण्यांनी जुन्या काळात नेले. राजा बढे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ संदिप खरे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला व चंद्रकांत बढे यांच्या अनुवादित पुस्तकाचं प्रकाशन माननीय भारतकुमार राऊत यांच्या हस्ते झालं.

सर्वात महत्त्वाची पुरस्कारामागची पार्श्वभूमी. आपल्या प्रस्ताविकात त्यांनी सांगितले. ते ऐकून हृदय हेलावून गेले. त्यांच्याच शब्दात... ''आज माझे बंधू राजा बढे यांचा स्मृतीदिन आहे. माझे बंधू राजा बढे हे राजासारखेच होते. त्यांनी धनाची, सत्काराची, नावाची, मान-सन्मानाची कधीच अपेक्षा केली नाही. खूप चांगली गीते त्यांनी लिहिली. कविता लिहिल्या. त्यांची अनेक गीते सिनेमात गायली गेली. तर काही गाणी आजही रसिक गुनगुनताना दिसतात. परिवाराच्या सुखासाठी, परिवारास संभाळण्यासाठी राजा बढे अविवाहीत राहिले. त्यांनी अनेक अजरामर गाणी लिहिली; परंतु त्यांना कुठल्याच सन्मानाने सन्मानित करण्यात आले नाही. त्यांना कुठलाच पुरस्कारही दिला गेला नाही. परिवारासाठी, साहित्यासाठी त्यांनी खूप योगदान दिलं परंतु त्यांचा कधीही सन्मान केला नाही, ही खंत माझ्या मनात सलत राहते. म्हणूनच राजा बढे यांच्या नावाने आपण साहित्यिकांना सन्मानित करून राजा बढे यांच्याही स्मृतीला उजाळा द्यावा व त्यांना आदरांजली म्हणून हा पुरस्कार सुरू करण्यात आला. त्यांच्या स्मृतीदिनी त्यांच्या साहित्याचे स्मरण केले जावे ही एक इच्छा! भाऊ म्हणून भावासाठी मी एवढे करू शकतो. भावाने माझ्यासाठी खूप काही केले. आज जो काही आहे तो मी माझ्या भावामुळेच! माझे कर्तव्य म्हणून त्यांच्या स्मृतीदिनी त्यांच्या स्मृती जागृत करूया.''

त्यांच्या बोलण्याने सर्वांना नि:शब्द केले आणि पुढिल वक्त्यांनी त्यांचा आधुनिक भरत म्हणून त्यांचा उल्लेखही केला. हे खरंच आहे की, बंधुप्रेमासाठी त्यांनी पुढाकार घेतला. भावाची पात्रता असूनही त्याचा कुठे सन्मान झाला नाही म्हणून ते दु:ख उरी न बाळगता इतरांना भावाच्या, कवी राजा बढेंच्या नावाने पुरस्कार सुरू करून त्यांच्या स्मृतीचा जागर केला. राजा बढे यांच्या नावाने ज्यांना पुरस्कार दिला गेला त्यांनाही पुरस्काराचा नव्हे तर आपलाच सन्मान झाला आहे असे वाटणे साहजिक आहे. असे बंधुप्रेम... असा बंधू विरळाच!

आपल्या बंधुच्या नावाने प्रथम पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी त्यांनी प्रसिद्ध अभिनेत्री आशाताई काळे यांनाही आमंत्रित केले होते परंतु त्या केवळ अभिनेत्री आहेत म्हणून नव्हे तर राजा बढेंशी सिनेजगतामुळे आशाताई यांचे पती स्व. बबन नाईक यांच्याशी असलेले घनिष्ठ संबंध असल्यामुळे. अशा आधुनिक भरताला माझा सलाम! मला त्यांचे खरेच खूप कौतुक वाटले! ■

# जानकरसाहेब पद मिळालं, आरक्षण कधी?

**एन्ट्रो– महाराष्ट्रातील अनेक महत्त्वपूर्ण निर्णय ज्या कॅबिनेटमध्ये घेतले जातात. त्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाच्या दोन मंत्र्यांचा समावेश करण्यात आला असल्याने अनेक वर्षे प्रलंबित असलेला धनगर आरक्षणाचा मुद्दा आता तरी मार्गी लागणार का? याकडे धनगर समाजाचे लक्ष लागले आहे. धनगर समाजाला आरक्षण मिळवून देण्याच्या भूमिकेवर महादेव जानकर इथून पुढेही ठाम राहून आरक्षण न मिळाल्यास बोलल्याप्रमाणे सत्तेतून बाहेर पडणार की मिळालेल्या पदावर समाधान मानणार इथेच त्यांची खरी कसोटी लागणार आहे...**



अलीकडच्या काळात आरक्षणावर जर कोणाला प्रश्न विचारले तर प्रत्येकजण आपापल्या परीने उत्तर देतो. मग प्रश्न कोणत्याही समाजाच्या आरक्षणाचा असो! असाच प्रश्न धनगर समाजाच्या आरक्षणाचाही आहे. गेल्या अनेक वर्षांपासून धनगर आरक्षणाचा प्रश्न विधानसभेत गाजत आहे. सरकारं आली, सरकारं गेली; पण प्रत्येकवेळी या समाजाला निवडणुकीपूर्वी आरक्षणाचे गाजर दाखवून केवळ स्वत:च्या मतांच्या पेट्या भरण्यासाठी वापर केला मात्र सरकार स्थापन झाल्यावर या मुद्यावर किती गांभीर्याने विचार केला? यावर प्रश्नचिन्ह निर्माण होते?

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रातील तमाम धनगर बांधवांनी पंढरपूर ते बारामती अशी संघर्षयात्रा काढून बारामतीमध्ये आमरण उपोषण सुरू केले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, दऱ्याखोऱ्यात राहणारा प्रत्येक धनगर बांधव आरक्षणाच्या आशेवरती बारामतीत आला होता. यावेळी कॉंग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार सत्तेत होते. या सरकारने या मुद्याकडे दुर्लक्ष करून आपली कोणतीही भूमिका स्पष्ट केली नाही. याचवेळी धनगर समाजाची मते स्वत:कडे वळविण्यासाठी आणि आमरण उपोषण सोडविण्यासाठी योग्य ती संधी साधून महाराष्ट्र भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष आणि सध्याचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बारामतीमध्ये आले होते. याचवेळी प्रचंड जनसमुदायासमोर आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले होते की, ''आमचे सरकार सत्तेवर आल्यावर केवळ पंधरा दिवसात आरक्षण देऊ.'' सरकार येवून अडीच वर्षे उलटल्यानंतरही फडणवीस सरकारने दिलेला शब्द तर पाळला नाही आणि वेळोवेळी काही न काही कारणे देवून हा मुद्दा तसाच तुंबत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

सलग पंधरा वर्षे सत्तेत राहूनही तत्कालीन आघाडी सरकारने धनगर आरक्षणावर गंभीरपणे विचार करून ठोस निर्णय घेतला नाही. युतीचे सरकार सत्तेत आल्यावर, तत्कालीन सरकारमध्ये उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजित पवारांसारख्या नेत्यांनीही पाठीवर घोंगडी आणि हातात काठी घेऊन आम्ही आरक्षणाच्या मुद्यावर किती गंभीर आणि संवेदनशील आहोत हे दाखवून देण्याचा नाटकी प्रयोग केला. यावरून असं दिसतं की 'तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो' म्हणजेच तू सत्तेत जा मी बाहेरून ओरडतो, नंतर तू बाहेरून ओरड मी सत्तेत जातो. या राजकीय डावपेचातच धनगर समाज मध्येच लटकून राहिला. हा झाला प्रस्थापित सरकारांचा प्रश्न; मात्र धनगर समाजाचे नेतृत्व करणारे आणि धनगर आरक्षण समाजाच्या दृष्टिने किती म हत्त्वाचे आहे, हे समाजावर प्रभावीपणे बिंबवणारे राष्ट्रीय समाज पक्षाचे सर्वेसर्वा महादेव जानकर हे धनगर आरक्षण मिळवून देण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे गेली काही वर्षे दाखवत असले, तरी भाजप सरकार सत्तेत आल्यावर त्यांची आक्रमक भूमिका बऱ्याच प्रमाणात मवाळ झाल्याचे दिसून येते.



**प्रियांका पोपट गुलदगड**
९९२३९४९९२६

नुकत्याच विस्तारित झालेल्या फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळामध्ये धनगर समाजाच्या दोन नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील अनेक महत्त्वपूर्ण निर्णय ज्या कॅबिनेटमध्ये घेतले जातात. त्यामध्ये या नेत्यांना संधी देण्यात आली असल्याने धनगर समाजाच्या आरक्षणाविषयीच्या अपेक्षा उंचावल्या आहेत; मात्र महादेव जानकरांनी आजवर ज्या पद्धतीने आरक्षणाचा मुद्दा गाजवला तितक्याच ताकतीने ही भूमिका ते पुढेही पार पाडणार का? की मिळालेल्या मंत्रीपदावर समाधान मानणार? येथेच त्यांची जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी आणि समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी खरी कसोटी लागणार आहे. अन्यथा आरक्षणाच्या मुद्यावर झाकण टाकण्यासाठी पदाचे गाजर दाखवून, मोजक्या नेत्यांना जवळ करून धनगरांची मते आपल्याकडे वळविण्याचा राजकीय डाव केलाय की काय? हे येत्या काळातच दिसून येईल. ■

# डेथपिल





**माधव गवाणकर**
९१४५९२४०५३

**आजीबाईने** कुठं रहायचं? मोठा प्रश्नच होता. तिचा व्यसनी मुलगा तिला देवळापाशी सोडून गेला आणि परत आलाच नाही. तो काही बाण लागून घायाळ झालेला श्रावणबाळ नव्हता. मुद्दाम तिला टाकून पळून गेलेला होता. तिला वृद्धांच्या आश्रमात ठेवण्याची त्याची ऐपत नव्हती. घरातली भांडीसुद्ध दारूसाठी विकून झाली होती. अशा घरात म्हातारीला कोण सांभाळणार? तिला त्या कुटुंबाने निराधार बनवून सोडून दिलं. निर्वासित म्हणून बोटीचा प्रवास करत, वेगवेगळ्या देशात आसरा मागत युद्धादवीतील हजारो माणसं भटकत असतात. अशी बातमी होती. म्हातारं-कोतारं बोटीवरच मेलं की, त्याचं शव समुद्रातच टाकून द्यावं लागत असणार. ज्या वयात नातवंडांना जुन्या कहान्या रंगवून सांगायच्या, झोपाळ्यावर बसून सुपारी कातरायची, त्या वयात ज्येष्ठ नागरिकांना जगात वेगवेगळ्या ठिकाणी किती भयानक त्रास सहन करावा लागतो! मरण येत नाही व जगण्यासारखं काही दिसत नाही, असत नाही! म्हणून मी म्हणतो की, नव्या जगात इच्छामरणाचा कायदा व्हायला हवा! स्वेच्छेने मृत्यू मिळायला हवा. कुणीतरी त्याचा दुरूपयोग करेल म्हणून सगळ्यांना का यातना? स्वर्ग, नरक 'आपल्या हातात काही नाही' हे जुन्या जगातले विचार, धारणा यामुळे मानवी हक्काचा विचार अशा कायद्याच्या बाबतीत होऊ शकत नाही. जगण्यावर आपला जेवढा अधिकार आहे; तेवढाच हक्क मरण्यावरही असायला हवा.

एखादे आजोबा स्वत: म्हणतात की, मला वेदना सहन होत नाहीत. तडफडत किंवा दुसऱ्यावर ओझं बनून मला जगायचं नाही. माझं दुखणंही 'साधं' नाही. मला मृत्यूची गोळी 'डेथपिल' द्या. तेव्हा ती कायदेशीर मार्गाने, वकिलाच्या मदतीने कागदोपत्री मिळायला हवी.

हे सागावं लागतं याचंही मला नवल वाटतं. हाडामांसाच्या, खऱ्या माणसांच्या असली प्रश्नांचा विचार करणार तर कधी? विचारवंत ज्येष्ठ नागरिकांना गोळ्या घालून मारण्यापर्यंत मात्र महाराष्ट्राची मजल गेली. तुम्ही म्हणाल, अख्ख्या महाराष्ट्राला त्यात कशाला ओढता? म्हणजे सत्य सांगणारे, प्रबोधन करणारे, मराठी माणसांसाठी आपली पूर्ण प्रज्ञाशक्ती वापरून मार्गदर्शन करणारे लोक ठार मारले गेले, तर महाराष्ट्राचं नाव घ्यायचं नाही? मग कुणाचं घ्यायचं?

'हॅलो, मिस्टर डेथ' म्हणणाऱ्या, स्वेच्छेने मरण स्विकारण्याऱ्यांना यातना मात्र होता कामा नये. वेदनाशुन्य मरण झोपेतच यावं म्हणजे दिलं जावं. तशी वैद्यकशास्त्राने सोय करावी! पत्रकार श्रीमती विद्या बाळ यांनीसुद्धा हा मुद्दा टीव्हीवर प्रभावीपणे मांडला होता.

हे केवळ ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत लागू करावं का? यावर चर्चा अवश्य व्हावी पण असाध्य व्याधी झालेली विद्यार्थीनीसुद्धा 'आय वॉन्ट टू डाय' असं लिहून ठेवते तेव्हा तिच्या वेदना तिच्याइतक्याच तिच्या नातलगांनाही बघवत नाहीत. तुम्ही देव आवश्य माना तो तुमचा खाजगी प्रश्न आहे, पण असे भयानक हाल होत आहेत तोपर्यंत मी तरी देव-देव करणार नाही. माझे नसतील झाले पण इतर मुला-माणसांचे तर होतातच ना? माझी सख्खी आज्जी देवभक्त होती. अर्धांगवाताने तिची वाचा गेली. अंथरूणाला खिळली. हाल झाले. दोन्ही मुलं, माझी आई व मामा तिची सेवा करत होते. तिच्या यातना मी वर्षभर पाहिल्या आणि नंतर कधीही कसलंही 'कर्मकांड' केलं नाही! तेव्हा 'डेथपिल' हवी, तसं 'विल'ही हवं!! ■

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस, सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे-४११ ०४१ येथे छापून ६१७, साईकृपा, शाहू गणपतीसमोर, शिवाजी रस्ता, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील (अंकातील मजकूराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२ Email : info@chaprak.com

# माधवी वैद्य यांच्या गैरकारभाराची चौकशी करा

**पुणे, (प्रतिनिधी) :**
अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या माजी अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांच्या कार्यकाळातील अ. भा. मराठी साहित्य संमेलन व विश्‍व साहित्य संमेलनाच्या आर्थिक कारभाराची चौकशी करावी, अशी मागणी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सातारा जिल्हा प्रतिनिधी व अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे सदस्य रविंद्र बेडकिहाळ यांनी महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांना पत्राद्वारे केली आहे.



बेडकिहाळ यांनी जोशी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे, १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१६ या कालावधीत अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे या घटकसंस्थेकडे होते. त्यावेळी महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य होत्या. या काळात सासवड, घुमान आणि पिंपरी-चिंचवड येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने झाली. तसेच अंदमान येथे विश्‍व साहित्य संमेलन झाले. या संमेलनात कोट्यवधी रूपयांचा खर्च झाला. अनेक प्रायोजकांकडूनही खूप मोठ्या प्रमाणावर देणग्या मिळाल्या. घुमान (पंजाब) येथील संमेलनाचा सर्व खर्च पंजाब शासनाने केल्याची माहिती आहे. डॉ. माधवी वैद्य महामंडळाच्या अध्यक्ष असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले. तीन पानांच्या संहिता लेखनासाठी तीस हजार रूपये मानधन घेणे, स्वत:च्या आणि मर्जीतल्या लोकांना आणि त्यांच्या संस्थांना सांस्कृतिक कार्यक्रमांची कंत्राटे देणे असे आरोप त्यांच्यावर झाले आहेत.

पुणे येथे झालेल्या संमेलनातून शिल्लक राहिलेला ८२ लाख रूपयांचा निधी डॉ. सतिश देसाई यांच्या पुढाकारामुळे मसापला मिळाला. डॉ. माधवी वैद्य यांच्या कार्यकाळात असे का घडले नाही? कोटीच्या कोटी उड्डाने होऊनही मसापचा आणि महामंडळाचा घडा रिकामाच का राहिला? असे प्रश्‍न या पत्रात उपस्थित करण्यात आले आहेत. या सर्व संमेलनांच्या आर्थिक व्यवहाराची, त्यातल्या आर्थिक हितसंबंधांची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी अशी मागणी रविंद्र बेडकिहाळ यांनी केली आहे.

# चित्रपट महामंडळाच्या जनसंपर्क अधिकारीपदी रामकुमार शेडगे

**पुणे, (प्रतिनिधी) :**
अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या जनसंपर्क अधिकारीपदी रामकुमार गोरखनाथ शेडगे यांची निवड करण्यात आली आहे. गेल्या एका दशकापासून चित्रपट, नाट्य, सांस्कृतिक, शैक्षणिक, उद्योग, क्रीडा व राजकीय क्षेत्रात राज्यात आघाडीचे नाव असलेल्या ‘जनसंपर्क मीडिया सर्व्हिसेस’ या संस्थेचे संचालक रामकुमार शेडगे हे आहेत.



चित्रपट महामंडळाचे अधिकृत जनसंपर्क अधिकारी म्हणून रामकुमार शेडगे व त्याची संस्था ‘जनसंपर्क मीडिया सर्व्हिसेस’ हे चित्रपट महामंडळाचे प्रसिद्धीचे काम पाहणार आहेत. या अगोदर रामकुमार शेडगे व त्याच्या संस्थेने योद्धा, दत्तर, डोंबारी, हायकमांड, हेडलाईन असे अनेक मराठी चित्रपट, हिंदीमध्ये क्रिश-३, रॉकी हँडसम, ड्रीम जॉब, सेनानी, कीस कीस को प्यार करू असे अनेक चित्रपट, नाटके शिवाजी अंडरग्रांड इंन भीमनगर मोहल्ला, जन्मरहस्य, स्वर्गात दादांची धम्माल अशी नाटके तसेच, सांस्कृतिक, शैक्षणिक, उद्योग, क्रीडा व राजकीय क्षेत्रात यांनी मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धीचे काम केले आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेवून आम्ही रामकुमार शेडगे यांची निवड केली आहे. अशी माहिती अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी दिली.


## ‘चपराक प्रकाशन’ची दर्जेदार ग्रंथसंपदा

### वैचारिक / राजकीय
- कोंबडं झाकणाऱ्या म्हातारीची गोष्ट । **भाऊ तोरसेकर** । १५०
- ओविली फुले मोकळी । **सदानंद भणगे** । १५०
- भाषेचं मूळ । **संजय सोनवणी** । ११०
- दखलपात्र । **घनश्याम पाटील** । १५०
- झुळूक आणि झळा । **घनश्याम पाटील** । १५०
- थोडं मनातलं । **विनोद श्रा. पंचभाई** । १२०
- कवडसे । **स्वप्निल कुलकर्णी** । ११०
- स्वा.सावरकरांचा मानवधर्म । **सुधाकर द. जोशी** । १२०
- श्रीराम एक चिंतन । **नरहरी पत्तेवार** । ८०

### कथासंग्रह
- एमरल्ड ग्रीन । **समीर नेर्लेकर** । ७५
- सारांश कथा । **व्यंकटेश कल्याणकर** । ५०
- खुलजा सिम सिम । **सदानंद भणगे** । १००
- सत्यापितम् । **चंद्रलेखा बेलसरे** । १३०
- गजरा । **दत्तात्रय वायचळ** । १००

### कादंबरी
- कॉलेज गेट । **सागर कळसाईत** । २४९
- मोरूनामा । **विजय तरवडे** । १००
- हरजीबुवाच्या नावानं **उमेश सणस** । १५०
- टर्मिनस व्हिक्टोरिया । **रमेश गोविंद वैद्य** । १२०
- दगडखाणीतील उद्ध्वस्त आयुष्य । **हणमंत कुराडे** । ७५
- बस नंबर बेचाळीस । **सुभाष कुदळे** । १००









## आयुर्वेद शास्त्राची ओळख करून देणारी पुस्तके

आयुर्वेद हे मनुष्यजातीच्या इतिहासातील सर्वात प्राचीन वैदकशास्त्र आहे. आयुर्वेद म्हणजे केवळ आजारांचे व त्यावरील वनस्पती उपचार, जडी, बुटी नाही तर निरामय जीवन जगण्याचा मार्ग सांगणारे भारतीय शास्त्र आहे. सध्या जग भारताकडे आशेने पाहत आहे. योग-आयुर्वेद-अध्यात्मशास्त्र यासारख्या जीवन पद्धतीनुसार संपूर्ण मनुष्यजातीचे जीवन आणखी समृद्ध, निरामय व स्वास्थ्यपूर्ण होईल. ही पुस्तके भारतीय जनमानसाला या आयुर्वेद शास्त्राची ओळख करून देण्याचा प्रयत्न करतात.







**संस्कृती प्रकाशन**, ६८८, नारायण पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०
**फोन :** ०२०-२४४९७३४३, ९८२३०६८२९२
**Email :** sanskrutiprakashan@yahoo.com
**www.sanskrutiprakashan.com**